**प्रेसनोट** **दिनांक ०२/०८/२०१९**

## गुन्हे शाखा पुणे शहर

दिनांक ०१/०८/२०१९ रोजी युनिट-१ पथकाने विश्रामबाग पो.स्टे. हद्दीत अष्टभूजा देवी मंदिरासमोर, नारायण पेठ, पुणे यथील सार्वजनिक रोडवर छापा टाकून इसम नामे मच्छिंद्र मारुती मते हा कल्याण मटका जुगार घेत असताना व इसम नामे १. पंकज गजानन जाधव रा. मंगळवार पेठ, पुणे, २. गणेश वसंत मोरे, रा. नारायण पेठ, ३. मनोज बाळासाो. गायकवाड, रा. पर्वती दर्शन हे कल्याण मटका जुगार खेळताना मिळून आल्याने त्यांना पकडून रोख रु. २०००/- व जुगार साहित्यासह माल जप्त करुन विश्रामबाग पो.स्टे. गुरनं म.जु.प्र.का.क. १२ (अ) प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच विश्रामबाग पो.स्टे. च्या हद्दीत १४ पानटप-या / व्यावसायिकांवर कोटपा ॲक्ट प्रमाणे खटले दाखल केले.

युनिट-२ व त्यांचे पथकातील कर्मचा-यांनी बंडगार्डन पो.स्टे. हद्दीत छापा टाकून इसम नामे सोनू शर्मा रा. भाजीमंडई, ताडीवाला रोड, पुणे याचे ताब्यातून बेकायदा अनाधिकृतपणे १० लिटर गावठी बाळगल्याचे मिळून आल्याने सदर प्रकरणी गुन्हा दाखल करुन ८५०/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच भारती विद्यापीठ पो.स्टे. चे हद्दीत छापा टाकून आरोपी नामे महादेव कोळी रा. इंगळे बिल्डींग, आंबेगावपठार, पुणे याचे ताब्यातून बेकायदा अनाधिकृतपणे ०५ लिटर गावठी दारु बाळगले प्रकरणी गुन्हा दाखल करुन २५०/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

युनिट-३ पथकातील अधिकारी / कर्मचारी यांनी जयहिंद लॉटरी सेंटर पारी कंपनीसमोर, चंदन हाईटस बिल्डींगचे तळमजल्यावर, न-हेगाव, पुणे येथे छापा टाकून चोरुन कल्याण मटका जुगार खेळणारे इसम नामे १. संदिप दत्तात्रय देवकर, २. लक्ष्मण हरिभाऊ जोगले, ३. श्रीधर पांडुरंग राव, ४. जय नागोराव वाघमारे, सर्व रा. न-हे पुणे यांना पकडून त्यांचे ताब्यातून रोख रु. ५१०५/- व कल्याण मटका जुगाराचे साहित्य असे जप्त करुन सिंहगडरोड पो.स्टे. मजुप्रका क. १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युनिट-४ कडील अधिका-यांनी चंदननगर पो.स्टे. चे हद्दीत हॉटेल फेरी नाईट येथे छापा टाकून विनापरवाना अनाधिकृतपणे देशी-विदेशी दारुच्या बाटल्या विक्री करीत असलेबाबत कारवाई करुन एकूण १२,९४०/- रु. किं. च्या देशी-विदेशी मद्य जप्त करुन एक आरोपीविरुध्द चंदननगर पो.स्टे. गु.र.नं. ३०६/२०१९, म.प्रो.का.क. ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युनिट-५ यांनी त्यांचे पथकातील कर्मचा-यांमार्फत त्यांचे युनिट हद्दीत एकूण ०९ पान टप-यांवर कोटपा ॲक्ट प्रमाणे खटले दाखल केले. तसेच कडील पोनि व त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी

मुंढवा पो.स्टे. येथील राजीव गांधीनगर, बुध्दविहार, मुंढवा येथे छापा टाकून इसम नामे सतिश चिंतामण गायकवाड, वय ५० रा. राजीव गांधी नगर, बुध्दविहार, मुंढवा यास बेकायदा गावठी हातभट्टीची दारु विक्री करीत असल्याचे मिळून आल्याने त्याचे ताब्यातून एकूण ०५ लीटर गावठी हातभट्टी दारु व रोख असा ८७०/- रु. किं. चा. मुद्देमाल जप्त करण्यात येवून त्याचेविरुध्द मुंढवा पो.स्टे. येथे म.प्रो.का.क. ६५ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचप्रमाणे काळेपडळ, हडपसर, पुणे याठिकाणी छापा टाकून इसम नामे रोहित सुरेश भोसले, वय २३ रा. काळेपडळ, हडपसर, पुणे यास बेकायदेशीर हातभट्टीची दारु विक्री करीत असताना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचेकडून १० लीटर गावठी दारु व रोख १०७०/- असा सर्व मिळून १७७०/- रु. किं.चा. मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत वानवडी पो.स्टे. येथे म.प्रो.का.क. ६५(ड) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

युनिट-५ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी वानवडी पो.स्टे. गुरनं १७४/१८, भादंविक ४२०,४०६ ४६५, वगैरे मधील पाहिजे असलेल्या असलेल्या भूषण निरंजनराव देऊळकर रा. अमरावती यास सापळा लावून पकडले व दाखल गुन्हयात अटक केली आहे.

पो.नि. खंडणी व अंमली पदार्थ विराधी पथक (पश्चिम) यांनी व त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी मिळालेल्या माहितीनुसार चतुःश्रृंगी पो.स्टे. हद्दीत पाषाण-सूस रोडवर दि. ०१/०८/२०१९ रोजी रात्रौ २१.०० वा. सापळा लावून स्वीफ्ट कार नं. एमएच-१४/जीएच/९८०० या कार चालकास पकडून सदर स्वीफ्ट कारमधून १.५ कि.ग्रॅ. गांजा किं.रु. १५,०००/- चा जप्त करुन स्वीफ्ट कार चालक नामे ज्ञानेश्वर दादाभाऊ खरपुडे, वय २० वर्षे, रा. हिंजवडी यास ताब्यात घेवून त्याचे विरुध्द चतुःश्रृंगी पो.स्टे. गु.र.नं. ६८३/१९, एनडीपीएस ॲक्ट क. ८(क), २०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

पो.नि. खंडणी व अंमली पदार्थ विराधी पथक (पश्चिम) यांनी समर्थ, फरासखाना, डेक्कन, बंडगार्डन या पो.स्टे. चे हद्दीत २४ पानटप-या / व्यावसायिकांवर कोटपा ॲक्ट प्रमाणे खटले दाखल केले. तसेच हडपसर पो.स्टे. चे हद्दीत छापा टाकून इसम नामे कुमार तुकाराम शेलार, रा. गंगानगर फुरसुंगी, पुणे याचे ताब्यातून बेकायदा अनाधिकृतपणे २० लिटर गावठी दारु किं. रु. ८००/- बाळगले प्रकरणी गुन्हा दाखल करुन सदरचा माल जप्त केला आहे.

पो.नि. खंडणी व अंमली पदार्थ विराधी पथक (पूर्व) पथकाने बिबवेवाडी, भारतीविद्यापीठ व चंदननगर या पो.स्टे. चे हद्दीत २९ पानटप-या / व्यावसायिकांवर कोटपा ॲक्ट प्रमाणे खटले दाखल केले.